Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000 I
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्त्वाचे / तात्काळ

क्र.रा.मं./परीक्षा-७/706
पुणे ४११ ००४.
दिनांक-१८/०२/२०२५

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :- फेब्रुवारी – मार्च २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) क्रीडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणेबाबत.

संदर्भ :- १. क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचे पत्र क.क्रीयुसे/प्रेसगुण/ऑन.अर्ज/२०२४–२५/का–४/३८९४, दि.१४ जानेवारी २०२५.
२. या कार्यालयाचे पत्र क.रामं./परीक्षा–७/५१०, दि.०६/०२/२०२५.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भिय क.२च्या पत्रान्वये फेब्रुवारी – मार्च २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडून क्रीडा प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने दि.१५/०४/२०२५ पर्यंत स्विकारण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने विद्यार्थी/शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे ऑनलाईन पध्दतीने अर्ज / प्रस्ताव सादर करण्यासाठी ऑनलाईन प्रणाली उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यानुसार आपले सरकार या पोर्टलवर URL: https://aaplesarkar.mahaonline.gov.in या लिंकव्दारे विद्यार्थी/शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे पाठवावयाचे आहेत. विद्यार्थी/शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यासाठी या सोबत ऑनलाईन प्रणालीचे User Manual या सोबत जोडले आहे. पोर्टलवर अर्ज भरताना अडचण आल्यास विद्यार्थ्यांनी पोर्टलवरील Toll Free क्रमांकावर संपर्क साधावा व क्रीडा गुण प्रस्ताव सादर करणेसंदर्भात काही अडचण आल्यास संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

शाळांनी/कनिष्ठ महाविद्यालयांनी क्रीडा प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे ऑनलाईन सादर करत असतानाच संबंधित खेळाडू विद्यार्थ्यांच्या संदर्भात या सोबतचे प्रपत्र क. १ विभागीय मंडळांनी शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून भरून घ्यावे. सदरचे प्रपत्र व प्रती विद्यार्थी रू.२५/–(रू. पंचवीस फक्त) प्रमाणे छाननी शुल्क प्रपत्रासह विभागीय मंडळामध्ये चलनाने, Online अथवा रोखीने भरणा करण्याबाबत शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करावे. सदर बाब आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, यांना तसेच सर्व संबंधित घटकांना लिखित स्वरूपात अवगत करून देण्याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४

जा.क्र.छ.संविमं/उमाक/860 दि.२२/०२/२०२५
प्रती,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर

विषय:- फेब्रु-मार्च २०२५ च्या माध्यमिक शान्लात प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) क्रिडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणेबाबत..

संदर्भ:- राज्य मंडळ,पुणे यांचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-७/७०६ दि.१८.०२.२०२५ अन्वये.

उपरोक्त संदर्भाकित विषयान्वे सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, फेब्रु-मार्च २०२५ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शाल्लात प्रमाणपत्र परीक्षा (इ. १०वी) क्रिडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणसाठी उपरोक्त संदर्भीय कार्यवाही करावी.कोणत्याही परीक्षार्थ्यांची तक्रार येणार नाही,याची नोंद घ्यावी.

(डॉ.वैशाली जामदार)
विभागीय सचिव,
विभागीय मंडळ,छत्रपती संभाजीनगर

प्रत माहितीस्तव तथा योग्य त्या कार्यवाहीस्तवः-
१. शिक्षणधिकारी (माध्य), जि.प.छत्रपती संभाजीनगर/बीड/जालना/परभणी व हिंगोली
२. जिल्हा क्रिडा अधिकारी, छत्रपती संभाजीनगर/बीड/जालना/परभणी व हिंगोली

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळ, स्टेशन रोड,
छत्रपती संभाजीनगर
Email: chair.aurboard@mahedu.gov.in/sschscboardabad@gmail.com
Tel: Div.Chairman(P) : (0240)-2331116 EPABX.-2334228/2334284 Div. Secretary (P) :2341035

जा.क्र.छसंविमं/उमाक/ ४८५९
दिनांकः- २७/०२/२०२५
०३ ०३

प्रति,

जिल्हा क्रिडा अधिकारी,

जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय,

छत्रपती संभाजीनगर/बीड/जालना/परभणी व हिंगोली

विषयः- फेब्रु-मार्च २०२५ च्या माध्यमिक शान्लात प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) क्रिडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणेबाबत..

संदर्भः- राज्य मंडळ,पुणे यांचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-७/७०६ दि.१८.०२.२०२५ अन्वये.

उपरोक्त विषयाच्या संदभर्भिय पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, फेब्रु-मार्च २०२५ च्या माध्यमिक शान्लात प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) परीक्षेस विद्यार्थ्यांना क्रिडा सवलतीचे गुण मिळण्यासाठी शाळा/क.महाविद्यालयाचे प्राचार्य/मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव आपल्या कार्यालयास सादर केलेले आहेत.

करीता शाळा/क.महाविद्यालयाचे प्राचार्य/मुख्याध्यापक यांनी वेळेत ऑनलाईन सादर कलेल्या प्रस्तावाची आपल्या स्तरावरुन उचित कार्यवाही करुन सदरचे सर्व प्रस्ताव दि.१५.०४.२०२५ पर्यंत या कार्यालयास ऑनलाईन सादर करण्यात यावे.विलंब होऊन विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास सर्वस्वी जवाबदारी आपली राहील,याची नोंद घ्यावी.

(डॉ.वैशाली जामदार)
विभागीय सचिव,
विभागीय मंडळ,छत्रपती संभाजीनगर

प्रत माहितीस्तव तथा योग्य त्या कार्यवाहीस्तवः-

१. मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, बालचित्रवाणी शेजारी, शिवाजीनगर,पुणे-०४.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळ, स्टेशन रोड,
छत्रपती संभाजीनगर
Email: chair.aurboard@mahedu.gov.in/sschscboardabad@gmail.com
Tel: Div.Chairman(P) : (0240)-2331116 EPABX -2334228/2334284 Div. Secretary (P) :2341035

जा.क्र.छसंविमं/उमाक/२४५८
दिनांकः-२८/०२/२०२५
०३ ०३

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्य.),

जिल्हा परिषद कार्यालय,

छत्रपती संभाजीनगर/बीड/जालना/परभणी व हिंगोली

विषयः- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा फेब्रु-मार्च २०२५ च्या परीक्षेतील सुधारीत केंद्रसंचालक यादी सादर करणेबाबत..

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, फेब्रु-मार्च २०२५ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) परीक्षेकरीता जिल्हयातील परीक्षा केंद्रावर केंद्रसंचालक नियुक्तीबाबत आपल्या स्तरावरुन कार्यवाही करण्यात येवुन केंद्रसंचालक यादी यापुर्वी मंडळास सादर केलेली आहे.

परंतु यापुर्वी आपण सादर केलेल्या केंद्रसंचालक यादीतील काही केंद्रसंचालकांची विविध कारणास्तव केंद्रसंचालक म्हणुन नियुक्ती रद्द करुन केंद्रसंचालक बदल केलेबाबत मंडळास सादर केलेल्या पत्रानुसार दिसुन येते. केंद्रसंचालक बदलाबाबत अशी कार्यवाही आपल्या स्तरावरुन झालेली असल्यास अशा केंद्रसंचालकांचे नाव व मोबाईल नंबरसह सुधारीत यादी दि.११.०२.२०२५ ते आजपावेतो त्वरीत या कार्यालयास सादर करावी.

(डॉ.वैशाली जामदार)
विभागीय सचिव,
विभागीय मंडळ,छत्रपती संभाजीनगर

प्रत माहितीस्तव तथा योग्य त्या कार्यवाहीस्तवः-

मा.शिक्षण उपसंचालक,शिक्षण उपसंचालक कार्यालय,छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळ, स्टेशन रोड,
छत्रपती संभाजीनगर
**Email:** chair.aurboard@mahedu.gov.in/sschscboardabad@gmail.com
Tel: Div.Chairman(P) : (0240)-2331116 EPABX -2334228/2334284 Div. Secretary (P) :2341035

जा.क्र.छसंविमं/उमाक/२४५२
दिनांक:-२८/०२/२०२५
०३ ०३

प्रति,

प्राचार्य,
सर्व उच्च माध्यमिक विद्यालये/कनिष्ठ महाविद्यालये
छत्रपती संभाजीनगर विभाग

विषय:- आगामी परीक्षेसाठी मान्यता तुकडी पेक्षा जादा विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्र खातरजमा करुन भरणेबाबत..

संदर्भ:- शिक्षण सहसंचालक,माध्यमिक व उच्च माध्यमिक राज्य,पुणे यांचे पत्र क्र.शाळा व्यव.एस-३/ तुशा/२०२५/१०६ दि.०९ जानेवारी २०२५

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रानुसार सर्व उच्च माध्यमिक विद्यालये/कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य यांना कळविण्यात येते की, आपल्या उच्च माध्यमिक विद्यालय/क. महाविद्यालयाची तुकडी/अतिरिक्त शाखा मान्यता आदेश व त्यामधील प्रवेश क्षमता तपासुन आगामी परीक्षेसाठी विद्यार्थ्याचे आवेदनपत्र भरण्यात यावे. मान्य तुकडी पेक्षा जादा विद्यार्थ्याचे आवेदनपत्र भरले जाणार नाहीत,याची दक्षता घेण्यात यावी.अन्यथा अतिरिक्त विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरल्यास सदरील आवेदनपत्र रद्द करण्यात येवून विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस आपण जबाबदार राहाल,याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

(डॉ.वैशाली जामदार)
विभागीय सचिव,
विभागीय मंडळ,छत्रपती संभाजीनगर

प्रतिलिपी योग्य त्या कार्यवाहीस्तव:-

१. .शिक्षण उपसंचालक,शिक्षण उपसंचालक कार्यालय,छत्रपती संभाजीनगर.यांना सदर पत्राची प्रत देवुन कळविण्यात येत की, आपल्या अधिनस्त उच्च माध्यमिक विद्यालय/क.महाविद्यालया कडुन तुकडी/अतिरिक्त शाखा मान्यतेच्या क्षमते पेक्षा जादा विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरले जाणार नाहीत याबाबत आपण सुध्दा संबंधित कनिष्ठ महाविद्यालयास कळवुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंडळाससादर करावा.

२.शिक्षणाधिकारी (माध्य.),जि.प.कार्यालय,छत्रपती संभाजीनगर/बीड/जालना/परभणी व हिंगोली यांना सदर पत्राची प्रत देवुन कळविण्यात येत की, आपल्या अधिनस्त उच्च माध्यमिक विद्यालय/क.महाविद्यालयाकडुन तुकडी/अतिरिक्त शाखा मान्यतेच्या क्षमते पेक्षा जादा विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरले जाणार नाहीत याबाबत आपण सुध्दा संबंधित कनिष्ठ महाविद्यालयास कळवुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंडळास सादर करावा.